पुण्य नगरी
www.epunyanagari.com | Toll Free 9773927928

# डी.पी. मध्ये विजय दिन समारंभ विविध उपक्रमांनी संपन्न

**कोरेगाव** / प्रतिनिधी

सैनिकी सेवा ही उत्तम सेवा आहे. जिद्द, जिकाटी व प्रयत्नांच्या जोरावर अपेक्षित यश संपादन करता येते आयुष्यामध्ये यश मिळवायचे असेल तर कष्ट हे महत्वाचे आहे. देश व समाजाच्या उन्नतीसाठी विद्यार्थ्यांनी सैनिकी सेवेत सहभागी व्हावे. सातारा जिल्हा हा वीर जवानांचा व क्रांतीकारकांचा आहे, असे प्रतिपादन कर्नल शिवाजीराव घाडगे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या डी.पी.भोसले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ शहीद स्फूर्ती केंद्र, २२ महाराष्ट्र बटालियन; एनसीसी कार्यालय, सातारा, सातारा जिल्हा सैनिक कल्याण मंडळ, विजय दिवस समारोह समिती, कोरेगाव, एक्स डीपीएन्स असोसिएशन व डी.पी. भोसले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विजय दिवस समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून १७ मराठा लाईट इन्फंट्री चे कमांडिग ऑफीसर कर्नल शिवाजीराव घाडगे बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे उपस्थित होते.

प्रिं.डॉ.कराळे म्हणाले, शहिदांनी दिलेल्या बलिदानातून देशाची जडणघडण झाली आहे. त्यांच्या बलिदानाची जाणीव ठेवून आजच्या युवकांनी देश सेवेमध्ये सहभागी व्हावे. प्रत्येकांच्या मनामनामध्ये देश प्रेम असावे. देश सेवेमध्ये शहिदांच्या कुटूंबियांनी देखील दिलेले योगदान विसरता येणार नाही.

प्रास्ताविक व स्वागत रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रिं.डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. यावेळी शहीद जवानांच्या कुटुंबियांचा सत्कार व शौर्य पदक विजेते सुभेदार दत्तात्रय घाडगे यांचा विशेष गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यानिमित्ताने रहिमतपूरच्या दख्खनचा राजा मर्दानी खेळ पथकाने अंगावर शहारे आणणारे प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. सरस्वती इंग्लिश मिडियम स्कूल कोरेगाव, चॅलेंज ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी व आरेच्या शिवतेज माध्यमिक विद्यालयातील मल्लखांब विद्यार्थ्यांनी विविध कसरतीतून तसेच विजय दिन समारंभाचे समन्वयक प्रा.बाळासाहेब भोसले यांनी कॉलेजच्यावतीने कोरेगाव शहरातून मोटर सायकलची भव्य अशी रॅली काढून शहीदांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमास शहीद जवानांचे कुटूंबिय श्रीकृष्ण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन, दिलीप वलियावेट्टील, चॅलेज ॲकॅडमीच्या प्राचार्या जोशी, कोरेगाव तालुका आजी-माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कॅप्टन महादेव भोसले, एनसीसी बटालियनचे सुभेदार मिरजी, कर्नल विष्णूपंत चव्हाण, एक्सडीपीएन्स असोसिएशनचे सचिव विजयकुमार घारगे, खजिनदार, दिपक देवरे, पृथ्वीराज बर्गे, राजेश बर्गे, संतोष नलावडे, शिवाजीराव भोसले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. विद्या नावडकर व प्रा. संगिता वीरकर यांनी केले.

आभार कोरेगाव नगर विकास कृती समितीचे सी.आर.बर्गे यांनी आभार मानले.

डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव